# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.07.2025** **वारःशनिवार**

---

1. पोलाद उद्योगाची भूमी असलेल्या पश्चिम बंगालचा पंतप्रधानांद्वारे गौरव
2. देशातल्या पहिल्या भारतीय सर्जनशीलता तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्थेचं मुंबईत उद्घाटन
3. विकसित देशांतील विद्यार्थी शैक्षणिक संधींसाठी भारतात येतील तो दिवस दूर नाही- केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचा विश्वास आणि
4. फिडे जागतिक महिला करंडक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत चार भारतीय खेळाडूंचा प्रवेश

**<u>पंतप्रधान-पश्चिम बंगाल</u>**

पश्चिम बंगालच्या भूमीनं अनेक महत्त्वाच्या व्यक्ती देशाला दिल्या आहेत, ही भूमी प्रेरणादायी आहे. पोलाद उद्योगाची भूमी असलेला हा भूभाग एकेकाळी रोजगार निर्मितीचे केंद्र होतं अशा शब्दांत पंतप्रधानांनी पश्चिम बंगालचा गौरव केला. पश्चिम बंगालमध्ये काल तेल, वायू, रेल्वे आणि रस्ते या क्षेत्रामधील पाच हजार कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते झालं. त्यावेळी उपस्थित जनसमुदायाला ते संबोधित करत होते. राज्यातून तरूण रोजगाराच्या शोधार्थ बाहेर राज्यात जात असल्याचं सांगून पश्चिम बंगालला विकास आणि परिवर्तनाची गरज असल्याचं सांगितलं. राज्याच्या विकासासाठी तसेच राजकीय परिवर्तन करण्यासाठी भाजपला सत्तेत आणण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. तत्पुर्वी पंतप्रधानांच्या हस्ते बिहारमध्येही विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी, लोकार्पण करण्यात आलं. यावेळी मोतिहारीतल्या सभेला संबोधित करताना, केंद्र आणि राज्य सरकार बिहारच्या विकासासाठी एकत्रित प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितलं. शिवाय पूर्व भागातल्या राज्यांच्या विकासासाठी काम करत असून, या राज्यांच्या विकासाशिवाय भारत विकसित देश होऊ शकत नसल्याचं ते म्हणाले.

**<u>अमित शहा</u>**

देशातल्या प्रत्येक गावात क्रीडा संस्कृती पोहोचवण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. 21व्या जागतिक पोलिस आणि अग्निशमन क्रीडा स्पर्धेतील भारतीय पथकाचा सन्मान त्यांच्या हस्ते करण्यात आला त्यानंतर ते बोलत होते. गेल्या दहा वर्षात देशात खेळांना खूप महत्त्व देण्यात आलं असून त्यासाठी अर्थसंकल्पातील तरतूदही पाच पटीनं वाढवण्यात आल्याचं शहा म्हणाले. सरकार 2036 च्या ऑलिम्पिक स्पर्धेच्या तयारीसाठी तीन हजारपेक्षा अधिक खेळाडूंना दरमहा पन्नास हजारांची मदत करत असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**आयआयसीटी**

देशातल्या पहिल्या भारतीय सर्जनशीलता तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्थेचं म्हणजेच आयआयसीटीचं उद्घाटन काल मुंबईत झालं. केंद्रिय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या आवारात उभारलेल्या या संस्थेचं उद्घाटन करण्यात आलं. युवा पिढीला सक्षम करुन कलात्मक निर्मिती उद्योगात आधुनिकता आणण्याचा सरकारचा दृष्टीकोन आहे असं सांगून या संस्थेमुळे देशातल्या युवा पिढीसाठी संधींची नवी कवाडं खुली होतील असं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. या संस्थेमुळं कलात्मक निर्मिती क्षेत्राला आवश्यक दिशा आणि संस्थात्मक पाठबळ मिळेल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. यावेळी वेव्ज भारत दालनाचंही उद्घाटन वैष्णव आणि फडणवीस यांच्या हस्ते झालं. तसंच आयआयसीटीच्या बोधचिन्हाचं आणि वेव्ज परिषदेच्या फलिताची माहिती देणाऱ्या अहवालाचं प्रकाशन करण्यात आलं.

**वैष्णव-हैदराबाद**

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी देशातील पहिली स्वदेशी सेमीकंडक्टर चिप या वर्षी तयार केली जाईल असं काल जाहीर केलं. हैदराबाद इथं केशव मेमोरियल एज्युकेशनल सोसायटीच्या 85 व्या स्थापना दिन समारंभात ते बोलत होते. ते म्हणाले की, सरकारन सहा सेमीकंडक्टर प्लांटना यापूर्वीच मान्यता दिली आहे आणि त्यांचं बांधकाम सुरू आहे. इंडिया एआय मोहिमेचा भाग म्हणून, मोफत डाटासेट आणि इतर साधनं अपलोड केली जात आहेत. विकसित देशांतील विद्यार्थी शैक्षणिक संधींसाठी भारतात येतील तो दिवस दूर नाही असा विश्वास वैष्णव यांनी व्यक्त केला.

**अमेरिका-स्फोट**

अमेरिकेच्या पूर्व लॉस एंजेलिसमधील एका प्रशिक्षण केंद्रात काल संध्याकाळी झालेल्या स्फोटात लॉस एंजेलिस काउंटी शेरीफ विभागातील तीन अनुभवी अधिकारी ठार झाले. स्फोटाचे कारण अद्याप कळू शकले नाही. मात्र, 1857 मध्ये या विभागाची स्थापना झाल्यापासून ही मोठी दुर्घटना असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**जी 20**

दक्षिण अफ्रिकेत सुरू असणारी जी-20 देशांचे अर्थमंत्री आणि केंद्रीय बँकेच्या गर्व्हनर यांची दोन दिवसीय बैठक काल संपली. डर्बनमध्ये झालेल्या चर्चेत संघर्ष, व्यापार तणाव, पुरवठा साखळीतील अडथळे, कर्ज आणि हवामानाशी निगडीत आपत्तींसह प्रमुख जागतिक आव्हानांवर चर्चा झाली. बैठकीनंतर जाहीर करण्यात आलेल्या निवेदनात, विद्यमान आणि भविष्यात भेडसावणाऱ्या जोखीमांना तोंड देण्यासाठी एकत्रित काम करण्याची सदस्य देश वचनबद्ध असल्याचे म्हटले आहे.

**छत्तीसगड-माओवादी**

छत्तीसगड राज्यातील नारायणपूर जिल्ह्यात काल सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत सहा माओवादी ठार झाले. राज्याचे पोलिस महानिरीक्षक पी. सुंदरराज यांनी दिलेल्या माहितीनुसार, माओवाद्यांविषयी माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकांनी काल दुपारी अबुझमाडच्या जंगलात कारवाई केली. चकमकीत ठार

झालेल्या सहा माओवाद्यांचे मृतदेह मिळाले असून, घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे जप्त करण्यात आली आहे.

**मेघवाल-आरोग्यम कक्ष**

केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी काल नवी दिल्लीतील शास्त्री भवन इथं महिला आरोग्यम कक्षाचं उद्घाटन केलं. सरकारी कार्यक्षेत्रातील महिलांच्या कल्याणासाठी हा उपक्रम एक महत्त्वाचं पाऊल आहे. महिला कर्मचाऱ्यांचं कल्याण खऱ्या अर्थानं सुदृढ आणि समावेशक भारत निर्माण करण्यासाठी आवश्यक असल्याचं मेघवाल यांनी सांगितलं. महिला आरोग्यम कक्ष वापरात नसलेल्या गॅरेजच्या जागेत तयार करण्यात आला आहे. इथं व्यायामाची उपकरणं आणि स्तनदा मातांसाठी स्वतंत्र कक्षाचीही सोय करण्यात आली आहे.

**बिर्ला-प्रतिनिधी मंडळ**

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काल नवी दिल्ली इथं माजी पंतप्रधान किम बू क्युम यांच्या नेतृत्वाखालील दक्षिण कोरियाच्या संसदीय शिष्टमंडळाची भेट घेतली. दहशतवादाविषयीच्या शून्य सहिष्णूता धोरणाबद्दल भारताच्या अढळ वचनबद्धतेचा बिर्ला यांनी यावेळी बोलताना पुनरुच्चार केला. दहशतवादाविरुद्धच्या भारताच्या लढाईत कोरियाच्या निरंतर पाठिंब्याची आशा त्यांनी व्यक्त केली.

**नेपाळ पंतप्रधान-लोकशाही**

नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी लोकशाहीचं रक्षण करण्यासाठी आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं स्पष्ट केलं आहे. काठमांडू इथं आंतरराष्ट्रीय लोकशाही वकील संघटनेच्या 19 व्या अधिवेशनाला काल ते संबोधित करत होते. नेपाळनं लोकशाहीच्या स्थापनेसाठी लढा दिला असून, लोकशाही आणि मानवी हक्कांची मूल्यं आणि नियमांचं  नेपाळ कधीही उल्लंघन करणार नाही अस ते यावेळी म्हणाले. गरीबी निर्मूलनाशिवाय मानवी हक्क स्थापन करता येणार नाही असं ठाम मत ओली यांनी व्यक्त केलं. या तीन दिवसीय परिषदेत जगभरातील कायदेतज्ज्ञ, मानवाधिकार रक्षक आणि शांतता समर्थक उपस्थित आहेत.

**MEA-EU निर्बंध**

भारत कोणत्याही एकतर्फी निर्बंध उपायांना मान्यता देत नाही असं परराष्ट्र मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. युरोपियन संघानं अलिकडे लागू केलेल्या निर्बंधांबद्दल काल बातमीदारांशी बोलताना, मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की भारत एक जबाबदार घटक आहे आणि तो आपल्या कायदेशीर जबाबदाऱ्यांशी पूर्णपणे वचनबद्ध आहे. भारत आपल्या नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी ऊर्जा सुरक्षेची तरतूद ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी मानतो. विशेषतः ऊर्जा व्यापाराच्या बाबतीत कोणतेही दुहेरी निकष नसावेत यावर त्यांनी भर दिला.

**कुस्ती**

हंगेरीत बुडापेस्ट इथं कुस्ती स्पर्धेत भारतीय महिला कुस्तीगीरांनी दोन सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्यपदक जिंकले. ऑलिंपियन अँटिम पंघल आणि हर्षिता यांनी आपापल्या वजन गटात विजय मिळवत सुवर्णपदकं जिंकली. हर्षितानं, कझाकस्तानच्या चार वेळा आशियाई विजेती झामिला बाकबर्गेनोवावर 10-0 असा दमदार विजय

मिळवत 72 किलो गटात दुसरं सुवर्णपदक जिंकलं. नेहा सांगवानला 57 किलो गटात रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं. या पदकांमुळं बुडापेस्ट स्पर्धेत भारताची एकंदर सहा पदकं झाली आहेत. या स्पर्धेतील गुणांमुळं कुस्तीगीरांना सप्टेंबरमध्ये क्रोएशियातील झाग्रेब इथं होणाऱ्या जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी चांगलं स्थान मिळविण्यास मदत होईल.

**बुद्धिबळ-जागतिक चषक**

ग्रँडमास्टर्स कोनेरू हम्पी, डी हरिका आणि आर वैशाली आणि आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुख यांनी FIDE जागतिक महिला करंडकाच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यामुळं भारत या स्पर्धेच्या अंतिम आठ टप्प्यात चार खेळाडू असलेला पहिला देश बनला आहे. पहिल्या आठमध्ये चार भारतीय खेळाडू असल्यानं, आता भारत आणि चीन यांच्यात विजेतेपदासाठी स्पर्धा आहे. पुढील महिला जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी आव्हान देणारे खेळाडू यातून निश्चित होतील.

**केरळ-इशारा**

केरळमध्ये, पाच जिल्ह्यांसाठी पावसाचा लाल बावटा फडकवण्यात आला आहे. या जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये आज सुटी जाहीर करण्यात आली आहे. मासेरांना 22 तारखेपर्यंत केरळ, कर्नाटक आणि लक्षद्वीप किनाऱ्यावरील समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**